लोकमत

**बाबुराव पाटील महाविद्यालय, अनगर**

अनगर : बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर येथे क्रीडा विभाग व एन.एस.एस. विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त योगाचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ताडासन, वक्रासन, पश्चिमोतासन, वज्रासन, शशांकासन, हलासन, शवासन, सवार्गासिन, नौकासन, पद्मासन, भुजंगासन, शीर्षासन अशा विविध आसन प्रकाराचे प्रात्यक्षिक करुन त्याचे जीवनातील महत्व सांगून सराव घेण्यात आला.

सर्व आसनांची प्रात्यक्षिके क्रीडा विभाग प्रमुख डॉ. बापू मोहिते यांनी करुन दाखविली व प्राणायामविषयी माहिती व प्रात्यक्षिके एन.एस.एस.विभाग प्रमुख डॉ.रवींद्र देशमुख यांनी करुन दाखविली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.